I.I.F.-I (एकीकृत अन्‌ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S. (पोलीस ठाणे):** गोंदिया शहर **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0449 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/06/2026 22:30 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 16/06/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 17/06/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 12:12 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:39 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 17/06/2026 **Time (वेळ):** 21:40 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 062 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 17/06/2026 21:53 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 01 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय गोंदिया, पंचायत समिती कार्यालय गोंदिया, गोंदिया

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निलेश सुरेश लोधी

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1978

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदि, गोंदिया, गोंदिया, गोंदिया शहर, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदि, गोंदिया, गोंदिया, गोंदिया शहर, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7620383888

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती शालु कमलेस  कावळे | | | 1. गजानन कलोनी,चौरागडे शाळेजवळ कुडवा,Town/Village (शहर / गाव): गोंदिया,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): गोंदिया शहर,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार  करण्यातील विलंबाची कारणे ):**

त्वरीत

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | एक विवो कंपनिचा मोबाईल | 5,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रू.दराचे विस चलनि नोटा | 10,000.00 |
| 3 | इतर | संकीर्ण/विविध | तिन  32 जीबी शमतेचे सँनडिक्स कंपनिचे मेमरीकार्ड | .00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 15,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

दिनांकः- 17.06.2026

नांवः- निलेश सुरेश लोधी, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया मो. क्र. 7620383888.

आम्ही दिनांक 16.06.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया कार्यालयात हजर राहुन कार्यालयीन कामे करीत असतांना वेळ 10.15 वा. तक्रारदार यांनी कार्यालयात येवुन लाच मागणी संबंधाने तक्रार द्यावयाची आहे असे सांगीतल्याने त्यांना त्यांचे नाव गाव तसेच तक्रारीसंबंधाने विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव प्रदीपकुमार ईन्दल भिमटे रा. मु.पो.दासगाव खुर्द ता.जि.गोंदिया, ह.मु. श्री नितीन गजभिये यांचे घरी किरायाने मरारटोली गोंदिया असे सांगुन ते भारतीय नौसेनाचे माजी सैनिक व पोलीस खात्यातुन सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक असल्याचे सांगीतले. ग्राम तेढवा ता. गोंदिया येथील सिलींगची जमीन भुमापन क्र.174 वर सन 2002-2003 पासुन अतिक्रमण करुन शेती करत आहेत. माजी सैनिक असल्याने शासनाकडुन सदर सिलींगची जमीन मिळावी म्हणुन दिनांक 7.5.2026 रोजी मा.तहसिलदार गोंदिया यांना त्यांचे ताब्यात असलेली जमीन Maharashtra Agricultural Land (Celling on Holding’s) Act1961 अंतर्गत अतिक्रमण नियमीत करुन त्यांचे नावावर देण्यात यावी याबाबत अर्ज केला असुन त्यांचे अर्जावर कार्यवाही करण्याकरीता तहसिल कार्यालय गोंदिया येथील लिपिक श्रीमती शालु कावळे हया त्यांना वारंवार फोन करुन 50,000/- रु. ची मागणी करीत असल्याचे सांगीतले. त्यावरुन त्यांना त्यांची तक्रार त्यांचे स्वहस्तक्षरात लिहुन देण्यास सांगीतले असता त्यांनी त्यांची तक्रार त्यांचे हस्ताक्षरात लिहुन दिली.

सदर तक्रारीवरुन लाच मागणीची पडताळणी करुन पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी मा. मुख्याधिकारी, नगर परिशद गोंदिया यांना पत्र देउन दोन शासकीय पंच नामे श्री. पप्पु भिमराज नकाशे, वय-47 वर्ष, पद-फायरमन, टॅक्स विभाग नगर परिशद गोंदिया व श्री. अभिषेक महेंद्र बोरकर, वय-42 वर्ष, पद- कनिष्ठ लिपीक, बाजार विभाग, नगर परिशद गोंदिया यांना उपलब्ध करुन घेतले.

त्यानंतर दोन्ही पंचाना तक्रारदार यांनी एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधी तक्रार नों ेदविलेली असुन त्या तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजित करून पुढील कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे असे सांगुन सदर कारवाई पंच म्हणुन काम करण्याची त्यांची संमती विचारली असता त्यांनी पंच म्हणुन काम करण्याची संमती दिली. त्यावरुन श्री. पप्पु

भिमराज नकाशे यांना पंच क्र. 1 तर श्री अभिषेक महेंद्र बोरकर यांना पंच क्र. 2 म्हणुन ठरविण्यात आले.

सापळा पार्टीतील सदस्य स.फौ.चंद्रकांत करपे, पो.हवा.मंगेश काहालकर, ना.पो.शी. अशोक कापसे, प्रशांत सोनवाने, म.ना.पो.शि रोहीणी डांगे व चानापोशी.दिपक बाटबर्वे सर्व ला.प्र.वि. कार्यालय गोंदिया तसेच तक्रारदार यांचा नमुद दोन्ही पंचांना परिचय करून देवुन यांचीच एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीसंबंधी तक्रार असल्याचे पंचांना सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहुन दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली. ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबंधी तोंडी विचारपुस केली. तक्रारदार यांनी नोंदविलेली तक्रार व त्यांनी तक्रारीसंबंधी तोंडी कथन केलेला मजकूर सारखाच असल्याची दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी तक्रारीवर सह्या केल्या व त्यानंतर आम्ही त्या तक्रारीवर सही केली. तक्रारदार यांनी नोंदविलेल्या तक्रारीतील मजकुर खालीलप्रमाणे आहे.

तक्रार

दिनांक 16.06.2026

प्रति,

मा. पोलीस उपअधिक्षक,
एन्टी करप्शन ब्युरो,
गोंदिया.

विशयः- श्रीमती शालु कावळे, लिपिक, तहसिल कार्यालय गोंदिया यांचे विरुध्द
लाच मागणी संबंधाने कायदेशीर कार्यवाही होण्याबाबद.

अर्जदारः- प्रदीपकुमार ईन्दल भिमटे, वय 62 वर्ष, व्यवसाय- सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक पोलीस विभाग, कायमचा पत्ताः- मु.पो.दासगाव खुर्द ता.जि.गोंदिया, सध्याचा पत्ता-नितीन गजभिये यांचे घरी किरायाने मरारटोली गोंदिया मो. क्र. 7887887843

महोदय,

विनंती अर्ज सादर आहे की, मी वरील अर्जदार भारतीय नौसेनचा माजी सैनिक व पोलीस खात्यातुन सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक असुन वरील पत्त्यावर राहत आहे.

मी माजी सैनिक असल्याने शासनाकडुन ग्राम तेढवा ता. गोंदिया येथील सिलींगची जमीन भुमापन क्र.174 मिळावी म्हणुन मा. तहसिलदार गोंदिया यांना अर्ज केलेला आहे. सदर जमीनीवर सन 2002-2003 पासुन अतिक्रमण करुन शेती करत आहे व त्याचा उल्लेख तलाठी रेकॉर्डमध्ये नोंदविण्यात आलेला आहे.

दिनांक 7.5.2026 रोजी मा.तहसिलदार गोंदिया यांना माझा ताबा असलेली जमीन

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

Maharashtra Agricultural Land (Celling on Holding’s) Act1961 अंतर्गत माझे अतिक्रमण नियमीत करुन सदर जमीन माझे नावावर देण्यात यावी याबाबत अर्ज करुन विनंती केली आहे.

तहसिल कार्यालय गोंदिया येथील लिपिक श्रीमती शालु कावळे ह्या मला वारंवार फोन करुन माझे अर्जावर कार्यवाही करण्याकरीता 50,000/- रु.ची मागणी करत आहेत. दिनांक 13.6.2026 रोजी वेळ 04.46 वाजता व दिनांक 14.6.2026 रोजी वेळ 05.57 वाजता पुन्हा फोन करुन ह्या प्रकरणात तुमचा काय विचार आहे तसे लवकर कळवा, पैसे दिल्याषिवाय तुमचे काम होणार नाही असे बोलल्या.

श्रीमती शालु कावळे, लिपिक ,तहसिल कार्यालय गोंदिया ह्या माझे अर्जावर कार्यवाही करण्याकरीता मागत असलेले रु.50,000/- कायदेषिर फि नसुन ती रक्कम स्वतःचे फायद्याकरीता लाच म्हणुन मागत असल्याने त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाही यावी. श्रीमती शालु कावळे लिपिक तहसिल कार्यालय गोंदिया यांचेषी माझे कोणतेही आर्थिक व्यवहार नसुन वैमनस्य नाही.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार यांना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणा-या अँथ्राॅसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग व त्यांचे वैशीष्टे समजावून सांगुण अधिनस्त अंमलदार यांचे करवी प्रात्यक्षिक करुन दाखविला.

तक्रारदार यांनी नोंदविलेल्या तक्रारी नुसार गै.अ. शालु कावळे, लिपिक, तहसिल कार्यालय गोंदिया यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हाॅईस रेकार्डरद्वारे लाच मागणीची पडताळणी करुन लाच मागणीची योग्य पडताळणी झाल्यास पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र 1 यांना गैरअर्जदार यांचेकडे पाठवुन तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात होणारे संभाशण व्हाईस रेकाॅर्डरद्वारे मेमरी कार्ड मध्ये रेकाॅर्ड करणे असल्याने आमचे सुचनेवरुन पो.हवा. मंगेश काहालकर यांनी तक्रारदार तसेच दोन्ही पंचांना कार्यालयीन ”सोनी“ कंपनीचे ICD-PX470 डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर तसेच सॅनडिस्क कंपनीचे नविन मेमरी कार्ड काढुन दाखविले. व्हाईस रेकार्डर मध्ये नविन सेल टाकुन व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यात कोणत्याही प्रकारची व्हाईस फाईल रेकाॅर्ड नसल्याची पंच व तक्रारदार यांना खात्री करुन दिली. त्यानंतर प्लाॅस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 5334XV54142E असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष प्लाॅस्टीक आवरणातुन बाहेर काढुन सदर डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचानी व आम्ही खात्री केली. सदर डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे आवाज कषा पध्द्तीने रेकार्ड करण्यात येते, व्हाईस रेकार्डर कषा पध्दतीने बंद करण्यात येतो याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचाना समजावुन सांगण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकार्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डर फाॅर्मेट करुन मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरीकार्ड मध्ये कोणत्याही प्रकारची रेकाॅर्ड फाईल नसल्याची पंचाना खात्री करुन दिली.

तक्रारदार यांना गै.अ. हे कोठे मिळतील? म्हणुन विचारणा केली असता त्यांनी गै.अ.हे तहसिल कार्यालय गोंदिया येथील त्यांचे कक्षात हजर मिळतील परंतु त्या त्यांचे कक्षामध्ये येण्यास मनाई करतात व तहसिल कार्यालयाचे बाहेरील परिसरात भेटतात असे सांगीतल्याने तक्रारदार यांना पंच क्र.1 यांचे सह तहसिल कार्यालय गोंदिया जवळ पाठवुन गै.अ.यांचे विरुध्दची लाच माणगी पडताळणी कार्यवाही आजच करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्याना लाच मागणी पडताळणी वेळी घेण्यात येणाÚया दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतल्या. त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले त्यावरुन पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली.
त्यानंतर आमचे सुचनेवरुन पो.हवा. मंगेश काहालकर यांनी सुस्थितीत करुन ठेवुन असलेला सोनी कंपनीचा ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकार्डर ट्रॅप सुटकेसमधुन बाहेर काढला व वेळ 12.12 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाशण ध्वनिमुद्रित करून तोे व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिशवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिल्यावर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथुन  तक्रारदार यांचे चारचाकी क्र. MH-43/BG-0326 ने गै.अ. यांचेषी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता तहसिल कार्यालय गोंदिया येथे पाठविण्यात आले. आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य ला.प्र.वि.कार्यालयात थांबुन राहीलो.

तक्रारदार हे गै.अ. यांचेषी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथे परत आले. आमचे सुचनेवरुन पो.हवा. मंगेश काहालकर यांनी तक्रारदार यांचे गळयात असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 13.00 वाजता बंद केले.व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260616_1212.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260616_1212.mp3 मध्ये तक्रारदार व गै.अ. यांच्यातील रेकॉर्ड झालेले संभाशण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविले. तक्रारदार व गै.अ यांच्यात झालेल्या संभाशणावरुन गै.अ. यांनी तक्रारदार यांना त्यांचे ताब्यात असलेली सिलींगची अतिक्रमीत जमीन भुमापन क्र.174 माजी सैनिक म्हणुन त्यांचे नावावर नियमीत करुन देण्याचे दिलेल्या अर्जावर कार्यवाही करण्याकरीता रु.50,000/- ची लाच रक्कमेची मागणी करुन त्यापैकी आता रु.10,000/- लाच रक्कम देण्यास व काम झालेवर उर्वरीत रु.40,000/- लाच रक्कम देण्याबाबत बोलुन रु.10,000/- लाच रक्कम स्विकरण्याची तयारी दर्शविल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली. तक्रारदार यांनी गै.अ.यांना लाचेची रक्कम ए.टी.एम.मधुन काढुन आणल्यावर कॉल करुन बोलावतो असे सांगीतले असल्याने गै.अ.यांचे विरुध्दची सापळा कार्यवाही आजच करण्याचे सर्वानुमते ठरविले.
ए

गै.अ. यांचे विरुध्द लाच मागणी पडताळणी झाल्यानंतर गैरअर्जदार यांनी मागणी केल्यानुसार

तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम जमा करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आल्यानुसार तक्रारदार यांना गै.अ.यांनी लाच मागणी पडताळणी दरम्यान मागीतलेली लाच रक्कम रु.10,000/- जमा करण्यास सांगीतले असता त्यांनी त्यांचे बचतीमधिल रु.10,000/- रक्कम आमचेकडे जमा केली. तक्रारदार यांनी जमा केलेल्या 500/- रू. दराचे 20 चलनी नोटा असे एकुण 10,000/- रू. नोटांचे क्रमांक आमचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी वाचले व पंच क्र. 2 यांनी पडताळुन पाहिले. रू. 500/- दराचे 20 भारतीय चलनी नोटांची वेगळी यादी तयार करण्यात आली आहे.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोशी अशोक कापसे यांनी आपले हाताच्या बोटाने तक्रारदाराने लाच म्हणून द्यावयासाठी हजर केलेल्या रू. 500/- दराचे 20 चलनी नोटांना दोन्ही बाजुने अँथ्राॅसीन पावडर लावुन अँथ्राॅसीन पावडर लावलेल्या चलनी नोटा एकुण रू. 10,000/-एका कागदी लिफाफ्यात टाकुन तो लिफाफा तात्पुरता ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवुन दिला.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली. गै.अ. यांनी तक्रारदाराकडुन रु. 10,000/- लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने अँथ्राॅसीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराचे 20 चलनी नोटा असे एकुण रू.10,000/- चा लाच रक्कमेचा लिफाफा आमचे सुचनेवरुन नापोशी अशोक कापसे यांनी ट्रॅप सुटकेसमधुन बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचेकडे दिला पंच क्र. 1 यांनी लिफाफ्यातुन लाच रक्कम बाहेर काढुन तक्रारदार यांचे फुलपँटचे समोरील खिषात ठेवुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथक यांना सापळा कार्यवाही दरम्यान घेण्यात येणा-या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्याचप्रमाणे नापोशी प्रशांत सोनवाने यांना दोन्ही पंच व तक्रारदार यांचे समक्ष सुचना दिल्या की गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार हे गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित ईशारा करतील त्यावेळेस तसेच आरोपी कडुन जप्त करण्यात येणा-या कार्यवाहीवेळी आपण कार्यालयीन मोबाईलमध्ये सदरचे चित्रीकरण करावे अषा सुचना देवुन त्यांचे मोबाईलमध्ये 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे ज्याचा सिरीयल क्र. 5334XV54141X असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन त्यांचे सॅमसंग कंपनीचे मोबाईलमधील मेमरी कार्ड स्लाॅट मध्ये Insert केले. त्यानतर मोबाईल सेटींग मध्ये जावुन सदरचे मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचा कोणताही डेटा जतन नसल्याची आम्ही पंचाना खात्री करून दिली. त्यानंतर मोबाईल मधील सेटींगमध्ये जावुन फोटो व व्हिडीओ चित्रीकरण हे डायरेक्ट मोबाईलमधील मेमरी कार्डमध्ये जतन होणार असल्याचे सुनिश्चित करण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पो.हवा मंगेश काहालकर यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमधुन लाच मागणी पडताळणी दरम्यान वापरण्यात आलेले मेमरी कार्ड बाहेर काढुन त्याचे प्लाॅस्टीक आवरणात ठेवुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवुन दिले. त्यानंतर प्लाॅस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 4034DXEV506V असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर तक्रारदार व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डीग फाईल नसल्याबाबत खात्री केली.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पो.हवा मंगेश काहाकलर यांनी वेळ 13.58 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे आवाजात लाच रक्कम देण्याकरीता गै.अ. यांचेकडे जात असल्याचे संभाशण ध्वनिमुद्रित करून ते व्हाॅईस रेकाॅर्डर कापडी पिशवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयात दोरीचे सहायाने शर्टचे आत लटकवुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथुन त्यांचे खाजगी चारचाकी वाहनाने गै.अ. यांना लाच रक्कम देण्याकरीता तहसिल कार्यालय गोंदिया येथे जाण्यास रवाना करण्यात आले. त्यानंतर आम्ही, पंच क्र. 2, पो.हवा.मंगेश काहालकर, म.नापोशी.संगीता पटले व चानापोशी.दिपक बाटबर्वे हे शासकीय वाहन क्र. एम.एच.35/अेडब्लु-0486 ने तर व स.फौ.चंद्रकांत करपे व नापोशी.प्रशांत सोनेवाने हे शासकीय मोटारसायकलने वाहनाने जाण्यास रवाना झालो. आम्ही सर्व गै.अ. तहसिल कार्यालय गोंदियाचे जवळ पोहचुन तक्रारदार यांचे नियोजीत ईशा-याची वाट पाहत बसलो. काही वेळाने तक्रारदार हे कोणताही ईषारा न करता परत जातांनी दिसल्याने आम्ही सर्व त्यांचे मागोमाग ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथे परत आलो.

त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पो.हवा. मंगेश काहालकर यांनी तक्रारदार यांचे गळयात लटकवुन असलेले व्हाॅईस रेकाॅर्डर बाहेर काढुन त्यामध्ये पंच क्र. 1 यांचे आवाजात 15.33 वाजता बंद केले. व्हाॅईस रेकाॅर्डरच्या मेमोरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260616_1358.mp3 रेकाॅर्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही सापळा कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरच्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260616_1358.mp3 मध्ये तक्रारदार व गै.अ. यांच्यातील रेकाॅर्ड झालेले संभाशण दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता कोणतेही संभाशण रेकाॅर्ड झाले नसल्याचे समजुन आल्याने सदर फाईलचे स्क्रिप्ट तयार करण्यात आली नाही व सदरचे मेमरी कार्ड उदयीक रोजी सापळा कार्यवाहीमध्ये वापरण्याचे ठरविण्यात आले.

त्याचप्रमाणे गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार हे गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित ईशारा करतील त्यावेळेस तसेच गै.अ. कडुन लाच रक्कम जप्त करण्यात येणाÚया कार्यवाहीवेळी चित्रीकरण करण्याकरीता नापोशी प्रशांत सोनवाने यांनी त्यांचे खाजगी मोबाईलमध्ये 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे सिरीयल क्र. 5334XV54141X असलेला मेमोरी कार्ड टाकला होता तो मेमरी कार्ड मोबाईलमधुन बाहेर काढुन त्याचे मुळ आवरणात ठेवुन उदयीक रोजी सापळा कार्यवाहीमध्ये वापरण्याचे ठरविले.

तक्रारदार यांना गै.अ श्रीमती शालु कावळे यांचा लाचे संबधाने फोन येतो अगर कसे? याबाबत ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथे वाट पाहत बसलो परंतु कार्यालयीन वेळ संपुन देखील गै.अ.यांचा तक्रारदार यांना फोन आला नाही. त्यामुळे तक्रारदार यांना गै.अ.यांचा फोन आल्यास आम्हास त्वरीत अवगत करुन आमचे सांगणेनुसार पुढील कार्य करावेे असे सांगुन पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांचे खिश्यातुन लाच रक्कम बाहेर काढण्यास सांगीतले. पंच क्र.1 यांनी तक्रारदार यांचे खिषातुन काढलेली लाच रक्कम एका कागदी लिफाफ्यात ठेवुन तो लिफाफा आमचे व दोन्ही पंचाचे सहीने सिलबंद करुन ट्रप सुटकेसमध्ये सुरक्षीत ठेवुन दिला व सदर कारवाई बाबत गोपनियता राखण्याचे तसेच दिनांक 17.6.2026 रोजी 10.00 वा.ला.प्र.वि.कार्यालयात हजर येण्यास सांगुन

तक्रारदार यांना त्यांचे घरी जाण्यास रवाना केले.

त्यानंतर आम्ही लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मधील मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मधील फाईल 260616_1212.mp3 मध्ये तक्रारदार व गै.अ. यांचेतील झालेले ध्वनिमुद्रीत संभाशण दोन्ही पंचांसमक्ष रिव्हर्स व फारवर्ड करुन ऐकले व ऐकविले. त्यातील लागु संभाशणाची स्क्रीप्ट तयार करुन त्यास परिषिष्ठ-अ असे शिर्षक देण्यात आले.

त्यानंतर डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मधील लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यानच्या मेमरी कार्डमध्ये रेकाॅर्ड झालेली संभाशण फाईल क्र. 260616_1212.mp3 ची लॅपटाॅपच्या साह्याने हॅश व्हॅल्यु काढुन सदर संभाशणाची स्क्रिप्ट तयार केल्यानंतर सदरचे मेमरी कार्ड हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यात ठेवुन त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सह्या करुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद करुन सदर मेमरी कार्ड जप्ती पत्रकाप्रमाणे जप्त करुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवुन दिले. त्यानंतर सापळा पथक व दोन्ही पंच यांना सदर कारवाई बाबत गोपनियता बाळगण्याचे सांगुन दिनांक 17.6.2026 रोजी सकाळी 10.00 वा. कार्यालयात हजर येण्यास सांगीतले. सदर कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र.1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

दिनांक 16.06.2026 रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक कार्यालयात हजर आलेत तक्रारदार यांना गै.अ.हया कोठे मिळतील म्हणुन विचारणा केली असता त्यांनी मी गै.अ. यांना काॅल केल्यावर त्या मला भेटण्यास तहसिल कार्यालयाचे बाहेर येतील असे सांगीतल्याने गै.अ. यांचे विरुध्दची सापळा कार्यवाही तहसिल कार्यालय गोंदिया येथे करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथक यांना सापळा कार्यवाही दरम्यान घेण्यात येणा-या दक्षतेबाबत सुचना पुन्हा समजावुन सांगीतल्या.
आमचे सुचनेप्रमाणे आमचे अधिनस्त अमलदार यांनी गै.अ. यांचेविरुध्दची सापळा कार्यवाहीसाठी लागणारे सर्व साहीत्याचे ट्रॅप सुटकेस, लॅपटाॅप, प्रिंटर जोडणी उपकरणासह असे संपुर्ण साहित्य शासकीय वाहन क्र. एम.एच.35/एडब्ल्यु 0486 मध्ये ठेवले.

आमच्या सुचने प्रमाणे दोन्ही पंचाना आमची व सापळा पार्टीतील कर्मचाÚयांची अंगझडती घेण्यास सांगीतले.

गै.अ. यांनी तक्रारदाराकडुन रु. 10,000/- लाच रक्कम स्विकारण्याची संमती दिल्याने अँथ्रासीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराचे 20 चलनी नोटा असे एकुण रू.10,000/- चा लाच रक्कमेचा सिलबंद लिफाफा आमचे सुचनेवरुन अधिनस्त अमलदार यांनी ट्रॅप सुटकेसमधुन बाहेर काढुन पंच क्र. 2 यांचेकडे दिला पंच क्र. 2 यांनी लिफाफ्यातुन लाच रक्कम बाहेर काढुन तक्रारदार यांचे फुलपॅंटचे समोरील खिशात ठेवुन दिल्या.

त्यानंतर आमचे अधिनस्त अमलदार यांना दोन्ही पंच व तक्रारदार यांचे समक्ष सुचना दिल्या की गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार हे गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा डोक्यावरील टोपी उतरवुन नियोजित ईषारा करतील त्यावेळेस तसेच गै.अ. कडुन जप्त करण्यात येणा-या कार्यवाहीवेळी आपण आपले खाजगी मोबाईलमध्ये सदरचे चित्रीकरण करावे अषा सुचना देवुन काल दिनांक 16.6.2026 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान वापरण्यात आलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे ज्याचा सिरीयल क्र. 5334XV54141X असलेला मेमोरी कार्ड पंचासमक्ष

ट्रॅप सुटकेस मधुन बाहेर काढुन त्यांचे सॅमसंग कंपनीचे मोबाईलमधील मेमरी कार्ड स्लॉट मध्ये Insert केले. त्यानतर मोबाईल सेटींग मध्ये जावुन सदरचे मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचा कोणताही डेटा जतन नसल्याची आम्ही पंचाना खात्री करून दिली. त्यानंतर मोबाईल मधील सेटींगमध्ये जावुन फोटो व व्हिडीओ चित्रीकरण हे डायरेक्ट मोबाईलमधील मेमरी कार्डमध्ये जतन होणार असल्याचे सुनिश्चित करण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन आमचे अधिनस्त अमलदार यांनी काल दिनांक 16.6.2026 रोजी सापळा कार्यवाहीदरम्यान वापरण्यात आलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे सिरीयल क्र. 4034DXEV506V असलेला मेमोरी कार्ड पंचासमक्ष ट्रॅप सुटकेस मधुन काढुन सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर तक्रारदार व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये दिनांक 16.6.2026 रोजीची सापळा कार्यवाही दरम्यानची एक फाईल व्यतिरीक्त दुसरी व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री केली.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन आमचे अधिनस्त अमलदार यांनी वेळ 11.33 वा. व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे आवाजात लाच रक्कम देण्याकरीता गै.अ. यांचेकडे जात असल्याचे संभाशण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिशवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयात दोरीचे सहायाने शर्टचे आत लटकवुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथुन तक्रारदार यांचे खाजगी चारचाकी वाहनाने गै.अ. यांना लाच रक्कम देण्याकरीता तहसिल कार्यालय गोंदिया येथे जाण्यास रवाना केले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 2 व सापळा पथकासह रवाना झालो. आम्ही सर्व तहसिल कार्यालय गोंदियाचे जवळ पोहचुन तक्रारदार यांचे नियोजीत ईषाÚयाची वाट पाहत बसलो.

तक्रारदार हे पंच क्र.1 सह तहसिल कार्यालय गोंदियाचे समोर रोडलगत असलेल्या गन्ना ज्युस सेंटर येथे जावुन मोबाईल फोनवर बोलतांना दिसले त्यानंतर लगेच पंच क्र. 1 सह तिथुन निघुन मोबाईलवर बोलत बोलत तहसिल कार्यालयाचे बाहेरील गेटकडे जावुन तिथे थांबले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 हे एका महिले सोबत बोलत बोलत पुन्हा पंचायत समिती कार्यालयाचे गेट जवळ असलेल्या गन्ना ज्युस सेंटर मध्ये गेले व ज्युस पित चर्चा करीत होते. ज्युस पिवुन झालेवर तक्रारदार यांनी आपल्या फुलपँटचे खिषातुन लाच रक्कम काढुन गै.अ.यांना दिली व गै.अ.यांनी ती लाच रक्कम हातानी स्विकारल्याचे दिसुन आले. लगेच तक्रारदार यांनी त्यांचे डोक्यावरील कॅप काढुन हातात ठेवुन गै.अ.यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित ईशारा केला. तक्रारदाराने केलेला नियोजित ईषारा तसेच प्रत्यक्ष घटना पाहुन आम्ही, सापळा पार्टीतील सर्व सदस्य पंच क्र. 2 यांचेसह तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे जवळ पोहचुन गै.अ. मनापोषि.रोहीणी डांगे यांनी गै.अ. यांचा तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम पकडुन ठेवुन असलेला डावा हात पकडुन त्यांना आपला परिचय देवुन सहकार्य करण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही लाच रक्कम स्विकारणा-या महिलेस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव श्रीमती शालु कमलेश कावळे वय 36 वर्ष, पद महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय गोंदिया, रा. श्री नरेंद्र गजभिये यांचे घरी किरायाने गजानन कॉलोनी, चैरागडे शाळेजवळ कुडवा (गोंदिया) असे सांगीतले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र.1 यांनी गै.अ.यांचे डाव्या हातात ठेवुन असलेली लाच रक्कम आपले ताब्यात घेवुन जवळ ठेवली. सदर कार्यवाहीचे आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे अधिनस्त अमलदार यांनी त्यांचे खाजगी मोबाईलमध्ये

चित्रीकरण केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना जवळ बोलावुन आमच्या सुचनेवरुन अधिनस्त अमलदार यांनी तक्रारदार यांचे गळयात लटकवुन असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कार्यवाही पुर्ण झाल्याबाबत वक्तव्य ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकॉर्डर 12.39 वाजता बंद केले व तक्रारदार यांना ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथे जावुन थांबण्यास सांगीतले. व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260617_1133.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले. घटनास्थळ हे मेनरोड वरील वर्दळीचे ठिकाण असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील कार्यवाही ला.प्र.वि.कार्यालयात जावुन करण्याचे ठरवुन आमचे सुचनेवरून अधिनस्त अमलदार यांनी घटनास्थळाचा नकाशा तयार केला. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आले आहेत.

तरी दिनांक 16.06.2026 रोजी तक्रारदार श्री प्रदिपकुमार ईंदल भिमटे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 16.06.2026 चे 12.12 वा ते 13.57 वा पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही व दिनांक 17.06.2026 चे 11.33 ते 12.39 वा सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्रीमती शालु कमलेश कावळे वय 36 वर्ष, पद महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय गोंदिया, यांनी तक्रारदार यांना त्यांचे ताब्यात असलेली सिलींगची अतिक्रमीत जमीन भुमापन क्र.174 माजी सैनिक म्हणुन त्यांचे नावावर नियमीत करुन देण्याचे दिलेल्या अर्जावर कार्यवाही करण्याकरीता रु.50,000/- ची लाच रक्कमेची मागणी करुन त्यापैकी आता रु.10,000/- लाच रक्कम देण्यास व काम झालेवर उर्वरीत रु.40,000/- लाच रक्कम देण्याबाबत बोलुन रु.10,000/- लाच रक्कम स्विकरण्याची तयार दर्षवुन ती लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारुन गैरफायदा घेतला आहे. म्हणुन माझी श्रीमती शालु कमलेश कावळे वय 36 वर्ष, पद महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय गोंदिया यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 (सुधारीत अधिनीयम 2018 ) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा नोंद होणेकरीता कायदेशीर फिर्याद देत आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** KISHOR JAYWANTRAO PARWATE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** KISHOR JAYWANTRAO PARWATE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** officer

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | 1989 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)